## 'विद्यार्थी समुपदेशन, व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळा' दोन दिवशीय समुपदेशन व व्यक्तिमत्व शिबीर

**दि.१६ व १७ डिसेंबर २०१९ रोजी** आजीवन शिक्षण व विस्तार विभाग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद आणि मिलिंद विज्ञान महाविद्यालय अतंर्गत दोन दिवसीय **'विद्यार्थी समुपदेशन, व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळा'** आयोजन करण्यात आले.

### दि.१७ डिसेंबर २०१९

**सत्र पहीले –**

या कार्यक्रमाचे **उद्‌घाटन प्रा.डॉ.संजय मुन,** विभाग प्रमुख, आजीवन शिक्षण व विस्तार सेवा विभाग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी त्यांनी आपल्या बीज भाषणात सांगतांना विद्यार्थ्यांना आजीवन शिक्षण विस्तार सेवा योजनेचे महत्व समजावून सांगीतले. तसेच भारतीय शिक्षण पध्दती व पाश्चात्य शिक्षण पध्दती याच्यातील फरक सांगीतला. तसेच डॉ.अब्दूल कलाम यांच्या व्हिजन २०२० वर प्रकाश टाकला. तसेच व्यक्तिमत्व विकासासाठी ध्येय निश्चिती व ध्येय प्राप्ती कशा प्रकारे साधता येईल या विषयावर विषयावर मार्गदर्शन केले.

**सत्र दुसरे -**

**डॉ.आनंद वाघ, सहाय्यक संचालक, आजीवन शिक्षण व विस्तार विभाग, डॉ.बा.आं.म.वि. औरंगबाद** यांनी विद्यार्थ्यांच्या तणावाचे व्यवस्थापन हया विषयावर मार्गदर्शन केले. डॉ.वाघ सरांनी अतिशय अल्हाददायक वातावरण निर्मिती करुन तणावमुक्ती व तणाव व्यवस्थापण या बाबत मार्गदर्शन केले.

**सत्र तिसरे – डॉ.डि.डि.कायंदे, सहयोगी प्राध्यापक,** सरस्वती भुवन विज्ञान महाविद्यालय, यांनी व्यक्तिमत्व विकास व नोकरीच्या संधी या वर मार्गदर्शन केले. या प्रसंगी रोजगार निर्मिती व नोकरीच्या संधी कशा मिळवाव्यात व त्या करीता कशी तयारी करावी याची माहिती विद्यार्थ्यांस दिली व विद्यार्थ्यांच्या मनामध्ये नवी उर्जा भरण्याचे काम त्यांनी केले.

### दिनांक १७ डिसेंबर २०१९

सत्र चौथे -

**प्रा.संजय खंडारे,** - करिअर मार्गदर्शन आणि भारतीय राज्यघटणा या दोन विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या प्रसंगी त्यांनी विद्यार्थ्यांना स्वतःच्या प्रगतीसाठी स्वतःमधील नकारात्म गुण कमी करुन स्वतःचा विकास करावा. भारतीय राज्यघटणा ही जगातील सर्वोत्तम राज्यघटणा आहे त्यामुळेच भारतातील लोक सुखी आणि समाधानी आहेत. असे विचार आपल्या व्याख्याना दरम्यान त्यांनी व्यक्त केले.

**सत्र पाचवे – डॉ.विद्याधर मरखेले, संचालक, एस.व्हि. लॅबोरेटरी, एमआयडीसी पैठण –**

यांची मुलाखत डॉ.ए.एस.मुंडे यांनी घेतली. मुलाखती दरम्याण उद्योग क्षेत्रामध्ये येणा-या विविध समस्या, अडचणी कशा सोडवाव्यात व विद्यार्थ्यांनी यशस्वी उद्योजक होण्या करीता काय करणे गरजेचे आहे असे वेगवेगळया प्रकारचे प्रश्न डॉ.ए.एस.मुंडे यांनी डॉ.विद्याधर मरखेले यास विचारले व त्यांनी सर्व प्रश्नांचे उत्तरे सोप्या भाषेमध्ये विद्यार्थ्यांना दिले व मार्गदर्शन केले.

**सत्र सहावे – समारोप सत्र**

**प्रा.श्रीहरी पाडव, संचालक, एनलाईट एज्युकेशन औरंगाबाद –**

यांनी स्पर्धा परिक्षांना सामोरे जातांना या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या प्रसंगी MPSC, UPSC आणि इतर स्पर्धा परिक्षेचे तयारी कशी करावी यावर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.डी.राठोड हे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी कुठल्याही परिक्षेची तयारी करतांना आगोदर ध्येय निश्चीत करावे व त्या दृष्टीने वाटचाल करावी म्हणजे यश लवकरात लवकर मिळेल. पदवी शिक्षणा दरम्यान स्पर्धा परिक्षेची तयारी कशी करावी वेळेचे व्यवस्थापन कसे ठरवावे.. स्पर्धा परिक्षेची तयारी करतांना अभ्यासामध्ये नेहमी सातत्य असावे, .एखादया वेळेस अपयश आले तर खचून न जाता प्रयत्न चालू ठेवावे व तसेच नेहमी सकारात्मक दृष्टीकोन ठेवावा. माणसाची निर्णय घेण्याची क्षमता उत्कृष्ठ असावी असे त्यांनी या वेळेस सांगितले या प्रसंगी समारोप भाषणात प्राचार्य डॉ.एस.डी.राठोड यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांनी गुणवत्तापुर्ण शिक्षण घेत असतांना व्यक्तिमत्व विकास साधावा. व स्वतःचे व्यक्तीमत्व चांगल्या प्रकारे घडवून देशाचा उत्तम नागरीक बनावे. शेवटी सहा विद्यार्थ्यांनी कार्यशाळेच्या आवश्यकते संबंधी आपले मत व्यक्त केले.

(डॉ.के.एन.विधाटे)
कार्यक्रम अधिकारी
आजीवन व विस्तार विभाग
मिलिंद विज्ञान महाविद्यालय
औरंगाबाद

(डॉ.एस.डी.राठोड )
प्र.प्राचार्य
मिलिंद विज्ञान महाविद्यालय
औरंगाबाद

Principal
Milind College of Science
Aurangabad


मिलिंद विज्ञान महाविद्यालय
आजीवन शिक्षण आणि विस्तार विभाग
विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन
कार्यशाळा
REDMI NOTE 5 PRO
MI DUAL CAMERA


पीपल्स एज्युकेशन सोसायटी, ( मुंबई )
मिलिंद विज्ञान महाविद्यालय
नागसेनवन, औरंगाबाद
न शिक्षण व विस्तार सेवा केंद्र
वसीय विद्यार्थी समुपदेशन व व्यक्तिमत्व विकास शिबीर
दि.८ व ९ जानेवारी २०१८


REDMI NOTE 5 PRO
MI DUAL CAMERA